तरुण भारत । बुधवार, ३१ जुलै २०१९

# कुशल प्रशासनामुळे दोडामार्ग कॉलेजचा नावलौकिक!

## दोडामार्ग नवनिर्माण संस्था अध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांचे गौरवोद्‌गार : प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

वार्ताहर

दोडामार्ग

प्राचार्य म्हणून कठोरपणे काम करताना अनेकदा कटू निर्णय घ्यावे लागतात. पण, डॉ. पाटील यांनी उत्कृष्ट प्रशासन कौशल्याद्वारे महाविद्यालयाला 'नॅक' कडून 'ब' हे उत्तम मानांकन मिळविले. एक बुद्धिमान व कुशल प्रशासक म्हणून त्यांनी नवलौकिक मिळविला. त्यांनी अनेक राष्ट्रीय सन्मानही मिळविले. केंद्र शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन 'नॅक' तथा राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती मंडळावर नियुक्ती करून गौरव केला. महाविद्यालय व संस्थेला अभिमानास्पद ही घटना आहे. प्राचार्य डॉ. पाटील यांच्या कामाचा हा सुगंध असाच याही पुढे दरवळत राहावा, यासाठी शुभेच्छा आहेत. पण, त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवे समृद्धीचा संस्था विकासात वापर करून घेणार आहोत, असे गौरवपूर्ण उद्‌गार नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये यांनी काढले.

डॉ. पाटील हे ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांचा सत्कार व निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरुन अभिजित हेगशेट्ये बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्राचार्य मेजर डॉ. श्रीपाद गीरसागर, बांदा कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीकांत सावंत, फणसगांव कॉलेजचे प्राचार्य डॉ. आशिष नाईक व बाबुराव वाघमोडे उपस्थित होते.

विविध महाविद्यालय, संस्था व आजी-माजी विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्यावतीने प्राचार्य डॉ. पाटील यांना गौरविण्यात आले. संस्था व महाविद्यालयातर्फे शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



दोडामार्ग : प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचा सत्कार करताना नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये. सोबत अन्य. समीर ठाकुर

यावेळी प्राचार्य डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाला शिस्तबद्ध नेतृत्व देऊन महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविली. विद्यापीठाची कायम संलग्नता व नॅककडून उत्तम अधिस्वीकृती मिळविल्याबद्दल तसेच कॉलेजच्या सर्वांगीण प्रगती केल्याबद्दल प्राचार्य डॉ. सावंत, प्राचार्य डॉ. श्रीपाद्र गिरसागर, प्राचार्य डॉ. आशिष नाईक व श्री. वाघमोडे यांनी प्रशंसोद्‌गार काढले. विद्यार्थ्यांच्यावतीने मेघा नाईक हिने हृदयस्पर्शी भाषणात प्राचार्य डॉ. पाटील यांनी अल्पकालात आपल्याला कसे प्रोत्साहित करून आत्मविश्वास वाढविला, याचे दाखले देत डॉ. पाटील यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. एस. एन. खडपकर व डॉ. शंभुदेव दरेकर यांनी भावना व्यक्त केल्या.

डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाची पाच वर्षे सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तीनंतरही महाविद्यालयाशी असलेले ऋणानुबंधाचे नाते कायम ठेवणार असून महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे स्पष्ट केले. वैयक्तिक जीवन आनंदी करण्यात व प्राचार्य म्हणून कारकीर्द यशस्वी करण्यात माझी पत्नी माधुरी पाटील यांचे योगदान हे लाखमोलाचे असल्याची भावना डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. विवेकानंद नाईक व डॉ. नाईक यांनीही शुभेच्छा दिल्या. यावेळी आजी-माजी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रामकिसन मोरे यांनी तर आभार प्रा. पाडगावकर यांनी मानले.

Scanned by CamScanner